(10)

## BEFORE NATIONAL- LOK- ADALAT HELD AT BARSHI,
**Dated 14th March 2026**

(Organized by the Member Secretary, District Legal Services Authority, Solapur under Section 19, Legal Services Authority Act1987)

Case No 105 of 2026
Exhibit No.

Name of the Court Which Referred the Case –

Mrs. Prajakta Suraj Dalve ---------- Applicant /plaintiff

V/s

Mr. Suraj Bharat Dalve and ors ---------- Respondent /Defendant

Present :-
Name of Judicial Officer – **Smt. P.V. Raut, Jt. C.J.J.D, & J.M.F.C., Barshi.**
**( Panel Head, National Lok Adalat)**

Name of the members --. Adv. Shri. Kapil K. Bhosale

**AWARD**

The dispute between the parties having been referred for determination to the Lok-Adalat and the parties having compromised matter. The following award is passed in terms of the settlement.

**As per pursis filed ~~below Exh.~~** annexed here with

The parties are informed that the court fee, if any, paid by any of them shall be refunded.

| | |
|---|---|
| Applicant/s | Adv. for applicants |
| 1) 2) 3) Respondent's | (Adv. Patil R.K.) Adv. for respondent's, |
| Acquiring Body | Adv. for Acquiring Body |

14.03.2026

| | |
|---|---|
| (Smt. P.V. Raut) | (Adv. Shri. Kapil K. Bhosale ) |
| Panel Head, | Member, |
| National Lok Adalat | National Lok Adalat |
| Date: 14/03/2026 | Place:- Barshi |

रे.मु.नं. १०५/२०२६

## बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि साहेब यांचे कोर्टात

**प्राजक्ता सुरज दळवे --- वादी**

**विरुध्द**

**सुरज भारत दळवे, वगैरे --- प्रतिवादी.**

**यात वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ ची तडजोड पुरसीस की,**

यातील वादी ही प्रतिवादी नं. १ ची पत्नी असून प्रतिवादी नं. २ हे सासरे व प्रतिवादी नं. ३ ही सासू आहे. वादी व प्रतिवादी नं. १ मध्ये किरकोळ मतभेद विकोपास जावून, प्रतिवादी नं. १ ने वादीस अंगावरील वस्त्रानिशी हाकलून दिले. त्यामुळे यातील वादी ही तिचे जिवन जगण्यास असमर्थ असल्याने ती वडिलांकडे आश्रयास जावून राहिली. तथापी वादीस सांभाळण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी ही प्रतिवादी नं. १ ची असताना तो टाळत होता म्हणून वादीने दरमहा र.रु. ३०००/- प्रमाणे मागिल तीन महिन्याची पोटगी वसूल होवून मिळावी व सदर पोटगीची टाच दावा मिळकतीवर ठेवण्यात यावी म्हणून सदरचा दावा मे. कोर्टात दाखल केलेला आहे. अशी स्थिती असली तरी यातील वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी सारासार विचार करुन प्रामुख्याने प्रतिवादी नं. २, ३ यांचे दोन अपत्ये विवाहापूर्वीच मयत झालेले असल्याने किमानपक्षी हया मुलाचा तरी प्रपंच सुखासमाधानाचा व्हावा तसेच त्यांची रोख रक्कम पोटगी म्हणून वादीस देण्याची ऐपत नसल्यामुळे म्हणून वादी व प्रतिवादीने आपसातील मतभेद वा तक्रार सोडून देवून आपसात तडजोड केलेली आहे ती खालीलप्रमाणे-

१) यातील वादी प्राजक्ता सुरज दळवे हिस प्रतिवादी नं. १ ची रोख रक्कम पोटगी देण्याची ऐपत नसल्यामुळे प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी वादीस हमी वाटावी म्हणून दावा कलम १ मधील डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे हत्तीज येथील शेतजमीन गट नं. १०७ याचे क्षेत्र हे. १५-९२ आर, + पो.ख. हे. ००-७० आर, असे एकूण क्षेत्र हे. १६-६२ आर, याचा आकार रु. २३-४३ पैसे, यापैकी उत्तरेकडील बाजुचे क्षेत्र हे. ०३-१० आर, आकार रु. ०४-५६ पैसे, **सदर जमिनीपैकी प्रतिवादी नं. १ चे पश्चिमेस क्षेत्र हे. ०१-०२ आर, याचा आकार रु. ०१-५२ पैसे** यासी चतुसिमा पुर्वेस- प्रतिवादी नं. १ चे क्षेत्र,



दक्षिणेस- सदर गटातील उर्वरीत सहहिस्सेदार, पश्चिमेस- प्रतिवादी नं. ३ चे क्षेत्र, व उत्तरेस- विकास जाधव यांची जमिन येणेप्रमाणे चतुसिमापूर्वक वर्णनाची जमिन आतील असलेल्या आंब्याची व नारळाची झाडे यासह आतील सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीच्या हक्कासह.

वर नमूद मिळकत ही यातील वादी प्राजक्ता सुरज दळवे यांना या तडजोडीद्वारे पोटगी पोटी दिलेले आहे.

२) सदर तडजोडीद्वारे यातील **प्रतिवादी नं. १ सुरज भारत दळवे** यांचे हिश्यास राहिलेले क्षेत्राचे वर्णन-



कलम १ मधील डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे हत्तीज येथील शेतजमीन गट नं. १०७ याचे क्षेत्र हे. १५-९२ आर, + पो.ख. हे. ००-७० आर, असे एकूण क्षेत्र हे. १६-६२ आर, याचा आकार रु. २३-४३ पैसे, यापैकी उत्तरेकडील बाजुचे क्षेत्र हे. ०३-१० आर, आकार रु. ०४-५६ पैसे, **सदर जमिनीपैकी पूर्व बाजुकडील क्षेत्र हे. ०१-०४ आर, याचा आकार रु. ०१-५४** पैसे यासी चतुसिमा पुर्वेस- अशोक ढवळे यांची जमिन, दक्षिणेस- सदर गटातील उर्वरीत सहहिस्सेदार, पश्चिमेस- वादी चे क्षेत्र, व उत्तरेस- विकास जाधव यांची जमिन येणेप्रमाणे चतुसिमापूर्वक वर्णनाची जमिन आतील असलेल्या आंब्याची व नारळाची झाडे यासह आतील सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीच्या हक्कासह

३) सदर तडजोडीद्वारे यातील **प्रतिवादी नं. २ भारत विठ्ठल दळवे** यांचे हिश्यास राहिलेले क्षेत्रापैकीचे वर्णन-



कलम १ मधील डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे हत्तीज येथील शेतजमीन गट नं. १०७ याचे क्षेत्र हे. १५-९२ आर, + पो.ख. हे. ००-७० आर, असे एकूण क्षेत्र हे. १६-६२ आर, याचा आकार रु. २३-४३ पैसे, यापैकी उत्तरेकडील बाजुचे क्षेत्र हे. ०३-१० आर, आकार रु. ०४-५६ पैसे, **सदर जमिनीपैकी पश्चिमेकडील बाजुकडील क्षेत्र हे. ००-५२ आर, याचा आकार रु. ००-७५ पैसे** यासी चतुसिमा पुर्वेस- प्रतिवादी नं. ३ यांची जमिन, दक्षिणेस- सदर गटातील उर्वरीत सहहिस्सेदार, पश्चिमेस- कालीदास पाटील यांचे क्षेत्र, व उत्तरेस- विकास जाधव यांची जमिन

येणेप्रमाणे चतुसिमापूर्वक वर्णनाची जमिन आतील असलेल्या आंब्याची व नारळाची झाडे यासह आतील सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीच्या हक्कासह.

४) सदर तडजोडीद्वारे यातील **प्रतिवादी नं. ३ सौ. सविता भारत दळवे** यांचे हिश्यास राहिलेले क्षेत्रापैकीचे वर्णन-



कलम १ मधील डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे हत्तीज येथील शेतजमीन गट नं. १०७ याचे क्षेत्र हे. १५-९२ आर, + पो.ख. हे. ००-७० आर, असे एकूण क्षेत्र हे. १६-६२ आर, याचा आकार रु. २३-४३ पैसे, यापैकी उत्तरेकडील बाजुचे क्षेत्र हे. ०३-१० आर, आकार रु. ०४-५६ पैसे, **सदर जमिनीपैकी वादीच्या पश्चिमेकडील बाजुकडील क्षेत्र हे. ००-५२ आर, याचा आकार रु. ००-७५ पैसे** यासी चतुसिमा पुर्वेस- वादीचे क्षेत्र, दक्षिणेस- सदर गटातील उर्वरीत सहहिस्सेदार, पश्चिमेस- प्रतिवादी नं. २ यांचे क्षेत्र, व उत्तरेस- विकास जाधव यांची जमिन येणेप्रमाणे चतुसिमापूर्वक वर्णनाची जमिन आतील असलेल्या आंब्याची व नारळाची झाडे यासह आतील सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीच्या हक्कासह. सदर तडजोडीसोबत दाखल केलेला नकाशा या तडजोडीचा भाग समजण्यात यावा.

५) वादी व प्रतिवादी १ ते ३ यांनी आपसातील बाकी सर्व तक्रारी सोडून दिलेल्या आहेत हे यातील वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहेत. तसेच यातील वादी व प्रतिवादी यांनी दाव्याचा खर्च आप आपला सोसण्याचा आहे. वादी व प्रतिवादी यांनी सदर तडजोडीन्वये मिळालेल्या क्षेत्राची नोंद गावच्या ७/१२ हक्कपत्रकी नोंदवून घेण्याची आहे. त्यास इतर प्रतिवादी यांनी हरकत तक्रार करणेची नाही. येणेप्रमाणे तडजोड हुकूमनामा करण्यात यावा.

हि तडजोड पुरसीस दिली ता. १४/०३/२०२६

**वादी तर्फे ॲड.**

**वादी**

(Adv. Patil R.K.)

**प्रतिवादी नं. १ ते ३ तर्फे ॲड.**

**प्रतिवादी नं. १ ते ३**

रे.मु.नं. 105/2026

बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. सो. यांचे न्यायालयात

प्राजक्ता सुरज दळवे —— वादी

विरुद्ध

सुरज भारत दळवे वगैरे —— प्र.वादी

यात वादी-प्रतिवादीतर्फे माहितीस्तव कच्चा नकाशा खालील प्रमाणे -

उत्तर

पश्चिम

| प्र.वादी नं.2 | प्र. वादी नं.3 | वादी | प्र. वादी नं. 1 |
|---|---|---|---|
| भारत | सविता | प्राजक्ता | सुरज |
| हे. आर | हे. आर | हे. आर | हे. आर |
| 00 = 52 | 00 = 52 | 01 = 02 | 01 = 04 |
| आकार रु. पैसे | आकार रु. पैसे | आकार रु. पैसे | आकार रु. पैसे |
| 00 = 75. | 00 = 75. | 01 = 52 | 01 = 54 |

सदर गटातील अन्य सह हिस्सेदार

पूर्व

दक्षिण

येणे प्रमाणे कच्चा नकाशा दाखल असे. ता. 14/03/2026

वादीतर्फे ॲडव्होकेट
(ॲड. डी. बी. नाईकनवरे)

वादी

प्रतिवादीतर्फे ॲडव्होकेट